''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे





श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

# राजे रामराव महाविद्यालय, जत


**ता. जत जि. सांगली – ४१६४०४**

फोन नं. (०२३४४) २४६२५१

Email : rajeramrao@gmail.com Website : www.rrcollege.org


NAAC Re-accredited with Grade **'B'** (CGPA 2.30 Third Cycle)




# माहितीपत्रक

## 2019-2020

## वरिष्ठ विभाग

(कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.ए. आणि पदव्युत्तर)

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार''

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

# Raje Ramrao Mahavidyalaya, Jath

Tal. Jath, Dist. Sangli - 416 404

## VISION

The motto of our management is "The propagation of education for knowledge, science and to inculcate the cultural values among the students". To provide modern education to the youth of the rural and drought prone area of Jath Taluka at the affordable cost for their all-round development.

## Mission

1) To impart value based job oriented and real life education.
2) To empower the students through modern learning techniques and participation in curricular, co-curricular, extra-curricular and extension activities.
3) To develop research culture among the faculty and the students.
4) To provide quality education to all by means of sheer hard work, dedication and devotion.
5) To promote a scientific temper among the faculty and the students.
6) To inculcate cultural values among the students and make them better and responsible citizens of India.
7) To ensure values like truth, honesty, character, true science, sacrifice among the students and curb exploitation through education amongest them.
8) To aim at overall personality development through extracurricular activities.
9) To attain communal and social development through infrastructural facilities of the college.
10) To provide a platform to the students to enhance their skills and potentials as well as a sense of social responsibility and nationality through sports, cultural, N.S.S., N.C.C. and other activities.
11) To train the students to face various competitive examinations.
12) To help the students for on-job training and placement of jobs wherever possible.

# ✲ प्रास्ताविक ✲

महाराष्ट्राचे आधुनिकीकरण व सर्वगामी विकास करण्यासाठी ज्या व्यक्ती चंदनाप्रमाणे झिजल्या त्यांची एक थोर परंपरा आहे. ही दैदिप्यमान परंपरा महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे अशी आहे.

या परंपरेतील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' हे ध्येय उराशी बाळगून कराडच्या कृष्णा-कोयनेच्या संगमावर मुरलीधराच्या साक्षीने शिक्षण प्रसाराच्या पवित्र कार्यास प्रारंभ करून दि. १९ ऑक्टो. १९५४ साली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. प्रारंभी फक्त पाच शाळा सुरू करणाऱ्या डॉ. बापूजी साळुंखे यांची अल्पावधीतच शाळा, महाविद्यालये, अध्यापक विद्यालये, व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रम, वसतीगृहे इत्यादी ४०६ पेक्षा अधिक सांस्कृतिक केंद्रे महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या ग्रामीण भागात सुरू करून ज्ञानदानाचा इतिहास घडविला. आज संस्थेत दहा हजाराहून अधिक गुरुदेव कार्यकर्ते ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत असून सुमारे दोन लाखापेक्षा अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी विद्यार्जन करीत आहेत.

## महाविद्यालयाची स्थापना :

जत तालुका तसा अवर्षणग्रस्तच. या अवर्षणग्रस्त भागात ज्ञानगंगोत्री घरोघरी पोहचावी. ज्ञानसूर्याचा लख्ख प्रकाश पडून संपूर्ण तालुक्याचे शैक्षणिक उत्थान व्हावे या आंतरिक जाणीवेने जत संस्थानचे श्रृतकीर्त थोरवीचे भूतपूर्व नरेश श्रीमंत विजयसिंहराजे डफळे यांनी इमारतीसह २२ एकरांचा भव्य परिसर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस दान दिला. श्रीमंत राजेसाहेबांचे उदार दातृत्व आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने संकल्पक, संस्थापक व थोर शिक्षण तज्ञ डॉ. बापूजी साळुंखे यांची जिद्द व चिकाटी यातून जून १९६९ मध्ये राजे रामराव महाविद्यालय आकारास आले. ५० वर्षापूर्वी लावलेल्या या इवल्याशा रोपट्याने आज महाकाय वटवृक्षाचे रूप घेतले आहे. ७० विद्यार्थ्यांच्यवर चालू झालेल्या ह्या महाविद्यालयात आज ३००० हून अधिक विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालय बेंगलोर स्थित राष्ट्रीय अधिस्विकृती व मूल्यांकन परिषदेच्या (NAAC) तिसऱ्या फेरीसाठी मूल्यांकनाला सामोरे गेले आणि या संस्थेकडून महाविद्यालयाला 'ब' दर्जा (CGPA 2.30) प्राप्त झाला.

आज या नॅक मानांकन प्राप्त संस्कार केंद्रात कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.ए. व पदव्युत्तर शाखांमध्ये ३१०० हून अधिक संख्येने शिकणारे विद्यार्थी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ध्येयानुसार कसे घडतील हा ध्यास घेऊन वेळ-काळाचे भान विसरून राबणारे गुरुदेव कार्यकर्ते कार्यरत आहेत. संख्यात्मक वाढी बरोबरच गुणात्मक वाढीचा आलेख कसा उंचावत राहील यासाठी व्यावसायाभिमुख शिक्षणाचीही सोय करण्यात आली आहे.

## महाविद्यालयाची उद्दिष्ट्ये आणि ध्येय धोरणे :

- विद्यापीठ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे.
- विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष परिश्रम घेणे.
- विद्यार्थ्यामध्ये शिस्त, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक बाधिलकी तसेच मानवी मुल्ये वाढीस लावणे.
- मागासवर्गीय विद्यार्थी–विद्यार्थिनीसाठी विशेष उपक्रम राबविणे.
- विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती आणि गळतीची समस्या सोडविण्यासाठी योग्य ती उपाय योजना करणे.

## ✲ महाविद्यालयाची वैशिष्ट्ये ✲

- **जत तालुक्यातील एकमेव अनुदानित वरिष्ठ महाविद्यालय.**
- **तज्ञ, अनुभवी व अभ्यासू प्राध्यापक वृंद.**
- **प्रशस्त ग्रंथालय व सुसज्ज प्रयोगशाळा.**
- **विद्यार्थी–विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सोय.**
- **गरीब, गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजने अंतर्गत आर्थिक सवलत.**
- **उत्कृष्ट निकालाची परंपरा, गुणवत्ता यादीत येण्यासाठी विशेष प्रयत्न.**
- **सर्व सोयींनी युक्त भव्य क्रिडांगण**
- **मुलां–मुलींसाठी स्वतंत्र 'जिमखाण्याची'ची व्यवस्था तसेच आठ लेन चा ट्रॅक, बॅडमिंटन कोर्ट**
- **शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या दूरशिक्षण** (Distance Education) **केंद्राची सोय.**
- **रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र या विषयांची पदव्युत्तर शिक्षणाची सोय.**
- **सलग दोन वर्षे शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती मध्ये द्वितीय व प्रथम**
- **संगणक या विषयाची सुसज्ज प्रयोगशाळा**
- **शैक्षणिक वर्षामध्ये पालक सभा व माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन.**

## ✲ महाविद्यालयाची शिस्त ✲

१. शै. वर्ष २०१७–१८ पासून सर्व विद्या शाखांसाठी ड्रेसकोड (युनिफॉर्म) सक्तीचे केले आहे त्याचे सर्व विद्यार्थ्यांनी पालन करावे.

२. प्रत्येक वर्गासाठी व विषयांसाठी प्रवेश मर्यादित आहे. तरी गतवर्षी या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला ह्या वर्षी प्रवेश मिळेलच असे नाही. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेळेत प्रवेश घ्यावा.

३. कॉलेजमधील प्रत्येक तासाला, परीक्षेला व शास्त्रीय प्रयोगाला नियमित व वेळेवर उपस्थित असणे आवश्यक आहे.

४. कॉलेजमधील चाचणी परीक्षेला जे विद्यार्थी बसणार नाहीत व समाधानकारक गुण मिळविणार नाहीत त्यांची टर्म रद्द करण्यात येईल.

५. अनुपस्थित राहणारा विद्यार्थी शिक्षेस पात्र ठरेल.

६. वर्ग चालू असताना कॉलेजच्या आवारात फिरता कामा नये.

७. कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:चे ओळखपत्र स्वत:च्या गळ्यात घालणे आवश्यक आहे. प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांनी मागणी केल्यास ते ओळखपत्र दाखविले पाहिजे. आणि भाग २ व ३ च्या सर्व विद्यार्थ्यांनी आपापले ओळखपत्र अद्यावत करणे आवश्यक आहे. ओळखपत्राविना महाविद्यालयात वावरणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

८. कॉलेजच्या प्रतिष्ठेला व शिस्तीला बाधा येईल असे कोणतेही वर्तन विद्यार्थ्याने कॉलेजमध्ये व कॉलेजच्या बाहेर करता कामा नये.

९. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार वर्गामध्ये किंवा महाविद्यालयाच्या परिसरामध्ये विद्यार्थ्यांना मोबाईल फोन वापरण्यास पूर्ण बंदी आहे. तसे आढळल्यास मोबाईल जप्त केला जाईल.

१०. शिवाजी विद्यापीठ परिपत्रक क्र. मु. क्रीडा/फा–७ ए–३०–३५/२७५ दि. १३–८–९९ नुसार वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला जातो. **स्पोर्टस् डे निमित्त वेगळ्या क्रीडास्पर्धा महाविद्यालयात होणार नाहीत.**

११. ग्रंथालयातील पुस्तके/मासिके यातील पाने फाडल्यास किंवा खराब केल्यास पुस्तकाच्या किमतीच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून आकारण्यात येईल.

१२. विद्यार्थिनींच्या तक्रारीचे निवारण अंतर्गत तक्रार निवारण समिती मार्फत करण्यात येईल. विद्यार्थिनींनी तशी आपली तक्रार तक्रारपेटीतच टाकावी.

१३. मागासवर्गीय विद्यार्थी असल्यास बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, जतचा खाते क्रमांक कार्यालयात द्यावा.

१४. ३१ ऑगस्ट पूर्वी भारत सरकार शिष्यवृत्ती फॉर्म/बी.सी.फ्रिशीप/ई.बी.सी./पी.टी.सी./माजी सैनिक इ. सवलतीचे फॉर्म कॉलेजमध्ये दिलेल्या मुदतीत जमा करावेत. अन्यथा होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

१५. प्रवेश अर्ज प्रवेशार्थीने स्वत:च्या हस्ताक्षरात भरणे आवश्यक आहे.

१६. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांला एस.टी. पाससाठी किंवा अन्य कामासाठी बोनाफाईड प्रमाणपत्र दिले जाईल. यासाठी रूपये १० (दहा) शुल्क आकारण्यात येईल.

१७. कोणत्याही वर्गासाठी किंवा अभ्यासक्रमासाठी बनावट किंवा चुकीची कागदपत्रे सादर करून प्रवेश मिळवणे तसेच चुकीची अथवा खोटी माहिती देवून सवलत मिळवणे यापैकी कोणताही गैरप्रकार घडल्यास त्याचा प्रवेश रद्द करून त्याचेवर कठोर कारवाई करणेत येईल.

१८. प्राचार्यांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या सूचना व नियम नोटीस बोर्डमध्ये लावण्यात येतात. त्या सूचनांचे व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील.

१९. बोनाफाईड व दाखला यासाठी मागणी अर्ज केल्यापासून तीन दिवसांत दिला जाईल.

२०. विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करताना घेतलेल्या विषयात कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही.

२१. प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने ठरविलेल्या गणवेशात उपस्थित असणे सक्तीचे राहील.

२२. वरील नियमात बदल करण्याचा व न उल्लेख केलेल्या बाबीसंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना आहे.

## ◆ प्रवेश पात्रता ◆

### बी.ए.भाग १/बी. कॉम. भाग १/बी.एस्सी.भाग १/ बी.सी.ए. भाग १

१. प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गामध्ये गुणवत्तेनुसार (१२ वीत मिळालेल्या गुणांची टक्केवारी) प्रवेश दिला जाईल. या महाविद्यालयातून १२ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ८०% जागांवर प्रवेश दिला जाईल. तथापि प्रवेश वेळापत्रकप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांची प्रवेश पात्रता कला / वाणिज्य / विज्ञान ज्या–त्या शाखेची असावी.

३. महाराष्ट्राबाहेरील मंडळाची परीक्षा अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असल्यास पात्रता प्रमाणपत्र द्यावे लागेल.

### बी.ए.भाग २/बी. कॉम. भाग २/बी.एस्सी.भाग २ / बी.सी.ए. भाग २

विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमानुसार प्रवेश देण्यात येतील.

### बी.ए.भाग ३/बी. कॉम. भाग ३/बी.एस्सी.भाग ३ / बी.सी.ए. भाग ३

प्रवेशार्थी शिवाजी विद्यापीठ किंवा इतर विद्यापीठाची भाग – १ ची परीक्षा उत्तीर्ण असावा. आणि भाग २ ची परीक्षा उत्तीर्ण किंवा ए. टी. के. टी. असावा.

### एम. एस्सी भाग १

शिवाजी विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेनुसार एम. एस्सी. फिजीक्स व केमिस्ट्री या विषयांना प्रत्येकी २० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

### प्रवेश घेताना विद्यार्थ्याने खालील प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१. ज्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा आहे त्यामागील वर्षाच्या परीक्षेच्या गुणपत्रिकेची मुळप्रत व प्रमाणित खरी नक्कल (झेरॉक्स).

२. शाळा सोडल्याचा मूळ दाखला.

३. अन्य महाविद्यालयातून येणाऱ्या विद्यार्थ्यास या महाविद्यालयात प्रवेश घेताना टी.सी. मागणी अर्ज करावा लागेल. टी.सी. प्राप्त झाल्याशिवाय प्रवेश निश्चित केला जाणार नाही.

४. अन्य विद्यापीठ कार्यक्षेत्रातून येणाऱ्या विद्यार्थ्यास स्थलांतरीत दाखल्याची (Migration Certificate) पूर्तता करावी लागेल व त्याची फी रु. २५०/– (दोनशे पन्नास) भरावी लागेल.

५. पात्रता प्रमाणपत्र :– (Eligibility Certificate) भाग – १ मध्ये प्रवेश घेणाऱ्यांना विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कॉलेजमध्ये मिळणाऱ्या फार्ममध्ये अर्ज करावा लागेल. महाराष्ट्राबाहेरील किंवा डी.एड्.होऊन येणाऱ्या विद्यार्थ्यास सदरची फी रु. ३००/– राहील.

६. प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याला काही कारणास्तव प्रवेश रद्द करावयाचा झाल्यास नियमानुसार त्या सत्राची संपूर्ण फी भरावी लागेल.

७. विद्यार्थ्याला प्रवेश देण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार प्रवेश समिती व प्राचार्यांकडे राहील व त्यांचा याबाबतचा निर्णय अंतिम राहिल.

# ◆ अभ्यासक्रम ◆

## ✲ कला विद्याशाखा (ARTS FACULTY) ✲

### बी.ए.भाग १ (CBCS) पॅटर्न

**अ) अनिवार्य विषय**

१. इंग्रजी
२. मराठी / हिंदी
३. लोकशाही प्रशासन व सुशासन (प्रथम सत्र)
Skill Development Course (SDC) (दुसरे सत्र)

**ब) ऐच्छिक विषय**

गट नं. १ – मराठी / भूगोल
गट नं. २ – हिंदी / राज्यशास्त्र
गट नं. ३ – इंग्रजी / इतिहास
गट नं. ४ – अर्थशास्त्र/शा. शिक्षण (झ. ए.)

**ऐच्छिक विषय निवडण्यासंबंधी नियम :–**

१. एकूण ४ ऐच्छिक विषय निवडावेत.
२. प्रत्येक गटातून एकच विषय निवडता येईल.
३. प्रत्येक विद्यार्थ्याला एकच ऐच्छिक भाषा विषय निवडणे आवश्यक आहे.
४. एक ऐच्छिक भाषा विषय निवडल्यानंतर इतर गटातील राहिलेले २ ऐच्छिक भाषा विषय घेता येणार नाहीत.

### बी. ए. भाग २ (CBCS) पॅटर्न

**अ) अनिवार्य विषय –**

१) इंग्रजी
२) पर्यावरणशास्त्र (Environmental Science)
३) आंतरविद्याशाखीय विषय :– (I.D.S.)
   अ) महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांचा इतिहास (H.S.R.M.) (इतिहास, मराठी, राज्यशास्त्र)
   ब) लोकप्रशासन (Public Administration) (भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, शारिरीक शिक्षण)
   क) सहकार (Co-operation) (राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास)
   ड) मराठी वाङ्मय दर्शन (Marathi) (हिंदी, इंग्रजी)
   वरीलपैकी एक ख.ऊड. विषय त्यापुढे दिलेल्या ऐच्छिक विषयाप्रमाणे निवडावा.

**ब) ऐच्छिक विषय :–** बी. ए. भाग १ मध्ये अभ्यासलेल्या ४ विषयापैकी २ ऐच्छिक विषयांचे प्रत्येकी २ पेपर्स खालील गटातून निवडावेत.

गट नं. १ मराठी / भूगोल
गट नं. २ हिंदी / राज्यशास्त्र
गट नं. ३ इंग्रजी / इतिहास
गट नं. ४ अर्थशास्त्र / शारीरिक शिक्षण

प्रवेश घेतेवेळी प्रवेश समितीने जो I.D.S. विषय दिला असेल तोच विषय परीक्षा फॉर्ममध्ये लिहावा. त्यामध्ये बदल केल्यास होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

### बी. ए. भाग ३

**अ) अनिवार्य विषय :–** १) इंग्रजी

**ब) ऐच्छिक विषय**

खालीलपैकी बी. ए. भाग २ मध्ये अभ्यासलेल्या २ ऐच्छिक विषयांपैकी एक विषय निवडावा. त्या विषयाचे प्रत्येकी ५ पेपर्स असतील.

१) मराठी २) हिंदी ३) इंग्रजी ४) अर्थशास्त्र ५) राज्यशास्त्र ६) इतिहास ७) भूगोल.

(टीप : प्रत्येक विषयाच्या प्रवेश क्षमतेवर आधारित त्या त्या विषयास गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.)

**Value Added Course : History of Jath Provice**

## ❊ वाणिज्य विद्याशाखा (COMMERCE FACULTY) ❊

**बी. कॉम. भाग १** (CBCS) पॅटर्न

1) लोकशाही प्रशासन व सुशासन (प्रथम सत्र) Skill Development Course (SDC) (दुसरे सत्र)
2) English Paper- 1
3) Insurance
4) Marathi / Principles of Marketing
5) Business Economics Paper-1
6) Management of Principles & Application
7) Financial Accounting

**बी. कॉम. भाग २** (CBCS) पॅटर्न

1) English Paper- II
2) Business Statistics
3) Corporate Accounting
4) Business Economics Paper-11
5) Fundamentals of Entrepreneurship
6) Money and Financial system.
7) Environmental Science.

**बी. कॉम. भाग ३**

1) Co-operative Development
2) Business Environment
3) Business Regulatory Framework.
4) Modern Management Practice.
5) Industrial Management - Paper No.-I

**OR**

6) Advanced Accountancy

सूचना - Advanced Accounting & Auditing हा विषय गुणवत्तेनुसार देण्यात येईल.

## ❊ विज्ञान विद्याशाखा (SCIENCE FACULTY) ❊

**बी.एस्सी.भाग १** (CBCS) पॅटर्न

1) English (Compulsory)
2) लोकशाही प्रशासन व सुशासन (प्रथम सत्र) Skill Development Course (SDC) (दुसरे सत्र)

The students should select one of the following groups -

1) Group - I Physics, Chemistry, Botany, Zoology.
2) Group - II Physics, Chemistry, Maths, Stat.
3) Group - III Physics, Computer Science, Maths, Stat. (20 Seats)
4) Group - IV Physics, Computer Science, Botany, Zoology. (20 Seats)

सूचना - Computer Science विषयासाठी वेगळी फी भरावी लागेल.

**बी.एस्सी.भाग २** (CBCS) पॅटर्न

1) Environmental Science (Compulsory)

The students should select one of the following groups -

1) Group - I Physics, Chemistry, Maths.
2) Group - II Physics, Maths, Stat.
3) Group - III Physics, Computer Science, Stat.
4) Group - IV Chemistry, Botany, Zoology.
5) Group - V Computer Science, Botany, Zoology.

सूचना - Computer Science विषयासाठी वेगळी फी भरावी लागेल व भाग १ मध्ये Computer Science विषय घेतलेल्यांना तो विषय अनिवार्य राहील..

**बी.एस्सी.भाग ३**

1) English (Compulsory)
   The Students Should select one of the following subjects of the previous year - Principal subject - 1) Chemistry 2) Physics 3) Maths 4) Zoology
2) वरील सर्व विषयास गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

**Note :-** 1) The students should give preference for at least two subjects.
2) As per University Syallabus educational tour is Compulsory for B.Sc.I, II & III Students. All above admissions for B. Sc.III will be given as per Merit list

## ⁕ बी. सी. ए. (B. C. A.) ⁕

**बी.सी.ए.भाग १** (CBCS) पॅटर्न

**Sem -I** लोकशाही प्रशासन व सुशासन (Compulsory) (प्रथम सत्र)
Skill Development Course (SDC) (दुसरे सत्र)

1) Paper -1 to 6

**Sem - II**

1) Paper -7 to 12

**बी.सी.ए.भाग २** (CBCS) पॅटर्न

**Sem - III**

1) Paper -13 to 18

**Sem - IV**

1) Paper -19 to 24

**बी.सी.ए.भाग ३**

**Sem - V**

1) Paper -25 to 30

**Sem - VI**

1) Paper -31 to 36

टीप : बी.सी.ए. भाग – १ करिता गुणवत्तेनुसार (इ. १२ वीत मिळविलेल्या गुणांची टक्केवारी) प्रवेश दिले जातील.

## ⁕ पदव्युत्तर विभाग (Post Graduate Courses) ⁕

**M.Sc. Physics (२०+२) व M.Sc. Analyatical Chemistry** (२०+२) ची प्रवेश प्रक्रिया शिवाजी विद्यापीठ अधिविभागामध्ये गुणवत्तेनुसार राबविली जाते.

### महाविद्यालयाची वेळ

**कला व वाणिज्य वर्ग स. ७.४५ आणि विज्ञान वर्ग स. १० पासून सुरू होतील.**

### कार्यालयीन वेळ

**सोम. ते शुक्र. सकाळी १०.०० ते दु. १.३० व दु. २.०० ते सायं. ५.३०**

**आणि शनिवार स. ८.०० ते १२.०० पर्यंत राहिल.**

### ग्रंथालयाची वेळ

**स. ७.४५ ते ५.३० पर्यंत राहिल.**

## ◆ प्रवेशाचे निकष ◆

महाराष्ट्र शासनाने, शिवाजी विद्यापीठाने आणि संस्थेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या वेळानुसार गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जाईल त्याचे निकष पुढीलप्रमाणे.

| अ.नं. | प्रवर्ग (Category) | आरक्षण प्रमाण |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (S.C.) | १३% |
| २. | अनुसूचित जमाती (S.T.) | ७% |
| ३. | विमुक्त जमाती – अ (V.J.A.) | ३% |
| ४. | भटक्या जमाती – (N. T. B.) | २.५% |
| ५. | भटक्या जमाती – (N. T. C.) | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती – (N. T. D.) | २% |
| ७. | इतर मागासवर्गीय (O.B.C.) | १९% |
| ८. | खुला प्रवर्ग (Open) | ५०% |
| | एकूण | १००% |

टीप : आरक्षणाबाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार आरक्षित जागावरील प्रवेश निश्चित केले जातील.

The College / Institution authority has to reserve the seats for admission for B.C. Students as per rules of the Govt. of Maharashtra up to the last date of admission 30% seats are reserved for female candidates at Graduate level as per G..R. No. GEC-2000 (123/2007)/T.E. I dated 17/4/2000. and 3% seats are reserved for persons with disabilities as per Govt. letter No. Misc. 1003/ (510/2003) Est. dated 27/10/2003.

**Phyically Handicaped, Ex-Serviceman, Girl Students will be admitted through parallel reservation for given Admission Quota.**

## ◆ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र ◆

**[Coaching for Entry in Services for SC/ST/OBC's)**

सन २००८–२००९ या शैक्षणिक वर्षापासून, अनुसूचित जाती–जमातीच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींसाठी शासकीय नोकरीकरिता द्याव्या लागणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र सुरू आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या परीक्षेची तयारी वर्ग जुलै पासून चालू असून त्यासाठी महाविद्यालयात स्वतंत्र विभाग कार्यरत आहे, या परीक्षेसाठी मार्गदर्शन घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना कोणतीही फी असणार नाही. या तयारी वर्गात विविध विषयाचे मार्गदर्शन, मुलाखत तंत्र, व्यक्तीमत्व विकास, भाषण कौशल्ये, संवादकला इ. घटकांचे विशेष मार्गदर्शन करण्यात येईल.

तसेच महाविद्यालयात प्रवेश नसलेल्या आणि पदवीधर असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही प्रवेश देण्यात येईल. इच्छुकांनी महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

याकरिता विशेष तज्ञ आणि अनुभवी व्यक्ती मार्गदर्शक म्हणून उपलब्ध होणार आहेत. शिवाय संगणकीय प्रणालीवर उत्तरे लिहण्याच्या सरावपरीक्षा घेतल्या जाणार आहेत.

## ❊ ग्रंथालयाचे नियम -

१. ओळखपत्र (आयडेंटी कार्ड) व बारोअर्स कार्ड ३१ जुलैपूर्वी ग्रंथालयातून घेणे आवश्यक आहे.

२. बारोअर्स कार्ड ३१ जुलैपूर्वी न घेतल्यास नंतर विलंब आकार भरावा लागेल.

३. नवीन ओळखपत्र काढणे, नूतनीकरण करणे, ओळखपत्र बदलणे ही कामे ३१ जुलैपूर्वी न केल्यास विलंब आकार भरावा लागेल.

४. ग्रंथालयाची पुस्तके ७ दिवसांकरिता बारोअर्स कार्डावर घरी वापरण्यास मिळतील. तसेच ७ दिवसानंतर पुस्तक जमा केल्यास दंड आकारला जाईल.

५. पुस्तके खराब करणे, पाने फाडणे इ. प्रकार आढळून आल्यास ग्रंथालय सवलत रद्द करण्यात येते/ दंड आकारण्यात येतो.

६. बुक बँकेची पुस्तके परीक्षा झाल्यावर ७ दिवसांच्या आत जमा करावी लागतात.

७. ग्रंथालय डिपॉझिट परत मिळवायचे झाल्यास मूळ रिसीट जोडून कॉलेज सोडल्यापासून सहा महिन्याच्या आत अर्ज करावा लागेल.

८. ओळखपत्रावरील फोटो काढणे दखलपात्र गुन्हा आहे. तसे केल्यास जबर दंडात्मक कार्यवाही होईल.

९. ओळखपत्र सध्याच्या (लेटेस्ट) फोटोसहित असणे आवश्यक आहे.

## ❊ एन्.सी.सी. - (N.C.C.)

महाविद्यालयात मुले व मुलींच्यासाठी एन. सी. सी. ची सोय आहे. वार्षिक कॅम्पससाठी पात्र कॅडेट्सची निवड केली जाते.

१. एन.सी.सी.मध्ये प्रवेश घेतल्यानंतर वर्षातील सर्व परेडस्ना नियमितपणे उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

२. विशेष प्राविण्य दाखविणाऱ्या कॅडेट्सना काही सवलती दिल्या जातील. याबाबत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहिल.

## ❊ राष्ट्रीय सेवा योजना - (N.S.S.)

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमात वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींना प्रवेश दिला जातो. राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत उपक्रमात महाविद्यालयाची आदर्श परंपरा आहे. महाविद्यालयात विद्यार्थी–विद्यार्थिनीवर आवश्यक असे संस्कार घडविण्यासाठी वृक्षारोपण, रक्तदान, श्रमसंस्कार शिबीर अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पूर्णपणे ऐच्छिक असलेल्या उपक्रमात सहभागी झाल्यास व दोन वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यास भावी काळात समाजसेवेचा पिंड घडविणारी ही योजना विद्यार्थ्यास फलदायी ठरते. राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर सुट्टीत घेतले जाते.

## ❊ युवक महोत्सव -

१. महाविद्यालयाचा सांस्कृतिक कार्यक्रम दर्जेदार आणि उच्च प्रतिचा असेल तर विद्यापीठ युवक महोत्सवात महाविद्यालय सहभागी होते.

२. विद्यार्थी कलाकारांना विविध गटातून आपले कलागुण व्यक्त करणेची संधी मिळेल हे कार्यक्रम महाविद्यालयाच्या सोयीने घेतले जातील याबाबत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहिल.

## ⁂ महाविद्यालयांतर्गत परीक्षा -

१. महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या सराव परीक्षा सक्तीच्या राहतील.

२. परीक्षेच्या वेळी कॉपी करणे किंवा करण्याचा प्रयत्न करणे हा कायद्यानुसार दखलपात्र गुन्हा आहे.

## ⁂ विद्यापीठ परीक्षा -

१) प्रवेश घेतेवेळी निवडलेल्या विषयांचीच विद्यापीठाची परीक्षा देता येईल.

२) ज्या विद्यार्थ्यांना बी.ए.भाग ३/बी.एस्सी.भाग ३ मध्ये जो स्पेशल विषय घ्यावयाचा आहे. त्यांना बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./बी.सी.ए. भाग १ मध्ये त्या विषयात पास असणे बंधनकारक राहिल. आणि बी.ए./बी.एस्सी. भाग २ मध्ये त्या विषयात पास असणे बंधनकारक राहील.

३) बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.भाग १ या वर्गासाठी १० गुणांची शारिरीक शिक्षण परीक्षा सक्तीची असून विद्यापीठामार्फत सदर परीक्षा वर्षाअखेरीस घेतली जाते. इतर विषयांना उत्तीर्ण होण्यासाठी व श्रेणी मिळविण्यासाठी या गुणांचा विद्यार्थ्यांना उपयोग होतो.

४) विद्यापीठ परीक्षा नियमात विद्यापीठाच्या आदेशानुसार वेळोवेळी होणाऱ्या बदलांचे पालन केले जाईल.

५) बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./बी.सी.ए.भाग १, २ व ३ साठी सेमिस्टर पध्दत लागू करण्यात आली आहे.

६) प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांनी विषय काळजीपूर्वक निवडावेत. प्रवेश घेतेवेळी निवडलेले विषय विद्यापीठ परीक्षा फार्म भरताना बदलता येणार नाहीत. तसे झाल्यास होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

७) राष्ट्रीय सेवा योजनेचे दोन वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या स्वंयसेवकांना पदवीच्या तृतीय वर्षाच्या गुणांमध्ये अधिकचे १० गुण दिले जातात.

**⁂ निवडणूक -** वर्ग प्रतिनिधींची निवड शिवाजी विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार करण्यात येते.

## ⁂ क्रीडा विभाग -

महाविद्यालयामार्फत वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला जातो. विविध खेळांच्या साधनानी क्रीडा विभाग समृध्द असून विद्यार्थ्यांकडे व्यक्तीगत लक्ष दिले जाते.

महाविद्यालयामध्ये स्नेह संमेलन होणार नाही. याची नोंद घेऊनच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावा. मात्र एक दिवस पारितोषिक वितरण समारंभ घेतला जाईल.

## ⁂ अभ्यासेत्तर उपक्रम -

महाविद्यालयातील विविध मंडळामार्फत व्याख्याने, चर्चासत्रे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध, काव्यवाचन स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा इ. विविध उपक्रम वर्षभर आयोजित केले जातात. तसेच 'रामविजय' वार्षिक अंकामधून व भित्तीपत्रिकेतून विद्यार्थ्यांच्या लेखन गुणांचे दर्शन घडविले जाते.

### ⁂ मुलींचे वसतिगृह -

संस्थामाता श्रीमती सुशिलादेवी साळुंखे मुलींच्या वसतिगृहाची स्वतंत्र व उत्कृष्ट सोय महाविद्यालयाच्या आवारात उपलब्ध आहे. प्रवेश क्षमता मर्यादित असल्याने गरजू विद्यार्थिनींनी आपला प्रवेश निश्चित करावा.

## ◆ शिष्यवृत्त्या व सवलती ◆

**१) सरकारी शिष्यवृत्ती –** राज्य सरकारची गुणवत्ता, प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणाऱ्या, अपंग विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या, काही विषयांच्या, तसेच शास्त्र, संशोधन बुध्दिमत्ता इ. शिष्यवृत्त्या उपलब्ध करून देण्याचे सर्व प्रयत्न केले जातात. तसेच प्राथमिक शिक्षकांची मुले (P.T.C.) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर सेवकांची मुले (S.T.C.), आजी व माजी जवानांची मुले (Jawan & Ex. Jawan), स्वातंत्र्यसैनिकांची मुले (Freedom Fighter Concession) इत्यादी शिष्यवृत्त्या व सवलतींसाठी विहित नमुन्यात अर्ज केल्यास फी माफी मिळते.

**२) शिवाजी विद्यापीठाची शिष्यवृत्ती –**

१) शिवाजी विद्यापीठाच्या इतर शिष्यवृत्त्या बी.ए. भाग १ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सामाजिक शास्त्र शिष्यवृत्ती, बी.ए. भाग २ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इतिहास व इंग्रजी विषयातील गुणवत्तेवर आधारित विशेष शिष्यवृत्ती दिली जाते.

२) राज्य सरकारची शिष्यवृत्ती (रू. १,०००/–) गणित व भौतिकशास्त्र विषयामध्ये विशेष प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारकडून हि शिष्यवृत्ती दिली जाते.

३) सेंट्रल स्केटर स्कॉलरशिप (१०,०००/– रू. प्रतिवर्ष)बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम./बी.सी.ए. भाग १ पासून प्रतिवर्षी राज्य सरकारकडून ही शिष्यवृत्ती गुणवत्तेनुसार दिली जाते.

४) एल.आय.सी. गोल्डन ज्युबिली शिष्यवृत्ती
(१०,०००/– रू. प्रतिवर्ष) बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./बी.सी.ए. १ पासून प्रतिवर्ष हि शिष्यवृत्ती दिली जाते.

**शिष्यवृत्ती अर्ज करताना अनुसरावयाची पध्दत –** या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थी–विद्यार्थिनींनी आपला शिष्यवृत्ती अर्ज इंटरनेटवर भरणे. भरलेल्या फॉर्मची हार्डकॉपी मुदतीत कार्यालयात सादर करावी.

* महाविद्यालयीन शिक्षणात खंड पडला असल्यास अर्जासोबत संबंधित काळामध्ये शिष्यवृत्ती न मिळाल्याचे प्रतिज्ञापत्र जोडावे. * नवीन शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरणाऱ्या विद्यार्थ्याने आपला स्वत:चा फोटो स्वत:च्या सहीनिशी आवेदन पत्रास जोडलेल्या सूचिपत्रकावर लावावा. * आई वडील हयात असल्यास इतर कोणत्याही नातेवाईकाची अर्जावर पालक म्हणून सही घेऊ नये. *शिष्यवृत्ती अर्जातील माहिती बिनचूक भरावी.

**बी. सी. शिष्यवृत्ती –** मागासवर्गीयांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास जास्तीत जास्त सोयी भारत सरकार शिष्यवृत्त्याद्वारे उपलब्ध करून देते. चालू शैक्षणिक वर्षात उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी खालील पात्रता आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची जात शासनाने मान्य केलेल्या मागासवर्गीय अनुसूचित जाती, जमाती, मुक्त जाती, भटक्या, निमभटक्या जातीमध्ये समाविष्ट असावयास हवी. पूर्वाश्रमीच्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याने किंवा त्याच्या पालकांनी बौध्द धर्म स्वीकारला तरी त्यांना शिष्यवृत्तीस पात्र समजण्यात येते. बी. सी. स्कॉलरशीप (भारत सरकार शिष्यवृत्ती) साठी उत्पन्न मर्यादा जात निहाय खालील तक्त्याप्रमाणे

## विद्यार्थ्यांना त्यांची जात, पालकांचे आर्थिक उत्पन्न यानुसार मिळणाऱ्या स्कॉलरशिपस् व फी सवलतीचा तक्ता

| अ. नं. | जातीचा वर्ग | वार्षिक उत्पन्नाची मर्यादा | मिळणारी सवलत | मिळणारी सवलत | करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (S.C.) | रू. २ लाखाचे आत | GOI स्कॉलरशिप | १. विद्यार्थ्यांच्या उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>२. वार्षिक उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांचेकडील) वडील नोकरीत असल्यास नोकरीच्या ठिकाणचा एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीचा दाखला.<br>३. पास झालेल्या परीक्षेच्या गुणपत्रकाची सत्यप्रत. | इंटरनेटवर अर्जाची माहिती भरून व योग्य ती कागदपत्रे जोडून अर्ज महाविद्यालयात सवलत विभागात मुदतीत जमा करावा. |
| २. | अनुसूचित जाती (S. C.) | रू. २ लाखाचे पुढे | फी सवलत Freeship | १. विद्यार्थ्यांच्या उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>२. पास झालेल्या परीक्षेच्या गुणपत्रकांची सत्यप्रत<br>३. मा. तहसिलदार यांच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला | इंटरनेटवर अर्जाची माहिती भरून व योग्य ती कागदपत्रे जोडून अर्ज महाविद्यालयात सवलत विभागात मुदतीत जमा करावा |
| ३. | अनुसूचित जमाती, भटक्याजाती व जमाती इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग (S.T./V.J.N.T./O.B.C. S.BC.) | रू. १ लाखाचे आत | GOI स्कॉलरशीप | १. विद्यार्थ्याच्या उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्याची प्रत<br>२. वार्षिक उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांचेकडील) वडील नोकरीत असल्यास नोकरीच्या ठिकाणचा एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीचा दाखला<br>३. पास झालेल्या परीक्षेच्या गुणपत्रकाची सत्यप्रत | इंटरनेटवर अर्जाची माहिती भरून व योग्य ती कागदपत्रे जोडून अर्ज महाविद्यालयात सवलत विभागात मुदतीत जमा करावा |
| ४. | अनुसूचित जमाती, भटक्याजाती व जमाती इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग (S.T./V.J.N.T./O.B.C S.B.C.) | रू. १ लाखाचे पुढे | फी सवलत | १. विद्यार्थ्याच्या उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्याची सत्यप्रत<br>२. पास झालेल्या परीक्षेच्या गुणपत्रकाची सत्यप्रत<br>३. मा. तहसिलदार यांच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला | इंटरनेटवर अर्जाची माहिती भरून व योग्य ती कागदपत्रे जोडून अर्ज महाविद्यालयात सवलत विभागात मुदतीत जमा करावा |

## विद्यार्थ्यांना त्यांची जात, पालकांचे आर्थिक उत्पन्न यानुसार मिळणाऱ्या स्कॉलरशिपस् व फी सवलतीचा तक्ता

| अ. नं. | जातीचा वर्ग | वार्षिक उत्पन्नाची मर्यादा | मिळणारी सवलत | मिळणारी सवलत | करावयाची पूर्तता |
|---|---|---|---|---|---|
| ५. | आर्थिकदृष्ट्या मागास (E. B. C.) | रू. १ लाखाचे आत | फी सवलत Freeship | मा. तहसिलदार यांच्या सहीच्या उत्पन्नाचा दाखला | प्रेसमधून सवलत अर्ज घेऊन संपूर्ण माहिती भरून व योग्य ती कागदपत्रे जोडून अर्ज महाविद्यालयात सवलत विभागात मुदतीत जमा करावा |
| ६. | प्राथमिक शिक्षक पाल्य सवलत (P.T.C.) | मर्यादा नाही | फी सवलत Freeship | सवलत अर्जावर पालक ज्या शाळेत सेवेत असतील येथील मुख्याध्यापकांची सही व शिक्का गट शिक्षणाधिकारी यांची सही घेऊन अर्ज महाविद्यालयात सादर करणे. | प्रेसमधून सवलत अर्ज घेऊन अर्जावरती गटविकास अधिकारी यांची सही व शिक्का घेवून अर्ज महाविद्यालयात मुदतीत जमा करावा |
| ७. | माध्यमिक शिक्षक पाल्य सवलत (S.T.C.) | मर्यादा नाही | फी सवलत Freeship | सवलत अर्जावर पालक ज्या शाळेत सेवेत असतील तेथील मुख्याध्यापकाची सही व शिक्का, घेऊन अर्जावर संबंधित माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी घेऊन अर्ज महाविद्यालयात सादर करणे | प्रेसमधून सवलत अर्ज घेऊन त्या अर्जावर पालक ज्या शाळेत सेवेत असतील तेथील मुख्याध्यापकांची सही व शिक्का घेऊन अर्जावर संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांची प्रतिस्वाक्षरी घेऊन अर्ज महाविद्यालयात मुदतीत जमा करावा. |
| ८. | आजी/माजी सैनिक पाल्य सवलत (Ex-Jawan) | मर्यादा नाही | फी सवलत Freeship | सवलत अर्जावर सैनिक कल्याण अधिकाऱ्यांची प्रतिस्वाक्षरी घेऊन अर्ज महाविद्यालयात सादर करणे | प्रेसमधून सवलत अर्ज घेऊन त्या अर्जावर सैनिक कल्याण अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी घेऊन अर्ज महाविद्यालयात मुदतीत सादर करावा |

**राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना :** सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षा पासून महाराष्ट्र शासनाने खुल्या प्रवर्गासाठी ज्या विद्यार्थ्यांचे उत्पन्न मर्यादा ८ लाखापर्यत असेल अश्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क परतावा मिळणेची सोय केली आहे. यासंबंधी वेळोवेळी कार्यालयाशी संपर्क साधून विद्यार्थ्याने फॉर्म भरावा.

(या संदर्भातील नोटीस वेळोवेळी नोटीस बोर्डावर लावल्या जातील. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांनी त्यावेळेत कागदपत्राची पूर्तता करणे ही पूर्णत: विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. तसे झाले नाही तर होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील.)

## ३) आर्थिकदृष्ट्या मागास मुलांसाठी फी माफीची योजना (इ.बी.सी.)

१) ज्या विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांचे अगर वडील हयात नसल्यास पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यास या योजनेचा फायदा घेता येतो त्याला प्रवेश शुल्क माफ होते. शासनाच्या नवीन नियमानुसार सदर नियमात बदल संभवतात.

२) या सवलतीमध्ये ठराविक नमुन्यात अर्जाची एकप्रत महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जासोबत दिली पाहिजे. अर्ज वेळेत भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील. ज्या वर्षी फी माफीच्या सवलतीसाठी अर्ज भरावयाचा आहे. त्यावर्षी संपलेल्या आर्थिक वर्षातील (म्हणजे १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०) या वर्षाचे एकूण उत्पन्न हिशोबात धरावयाचे असते. विहित नमुन्यातील उत्पन्नाच्या दाखल्यामध्ये वरील मुदतीतील उत्पन्नाचा उल्लेख असावा.

३) सर्व विद्यार्थ्यांनी मा. तहसिलदार यांच्या सही व शिक्यानिशी उत्पन्नाचा दाखला सादर करावा.

४) नोकरी करीत असलेल्या पालकांनी आपल्या नोकरीच्या ठिकाणचा गत आर्थिक वर्षाचा उत्पन्न दाखला सविस्तर खालील तक्त्याप्रमाणे जोडणे आवश्यक आहे.

| Month | Pay | D. A. | HRA | VA | Other | Total |
|---|---|---|---|---|---|---|

५) आई - वडील हयात असल्यास दोघे किंवा त्यांच्यापैकी जे असतील तेच मुलांच्या पालनपोषणासाठी जबाबदार आहेत असे गृहीत धरले जाईल. याशिवाय दुसरे नातलग म्हणजे चुलते, भाऊ, मामा यांना जबाबदार धरले जाणार नाहीत.

६) ज्या विद्यार्थ्यांचे आई-वडील / पालक यांचे नेहमी राहण्याचे ठिकाण महाराष्ट्र राज्य सीमेत आहे त्यांनाच फक्त सरकारमान्य संस्थात ही सवलत मिळू शकते.

७) नियमित उपस्थिती, अभ्यासातील समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक यावर फी माफीची सवलत मिळणे अवलंबून राहील.

८) फी माफी घेणारा विद्यार्थी या नियमांचे पालन करीत नाही असे आढळून आले तर ही सवलत काढून घेतली जाईल.

## ❊ विद्यार्थी सहाय्य निधी - (S. A. Fund) ❊

या निधीतून अभ्यासू, गरीब, शिस्तप्रिय विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत अल्प स्वरूपात आर्थिक मदत केली जाते. कमवा शिका योजनेनुसार ही आर्थिक मदत दिली जाईल. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना या निधीतून सहाय्य मिळत नाही. सूचनेप्रमाणे ठरावित नमुन्यात अर्ज करून होतकरू विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.

## ❊ विशेष मार्गदर्शन वर्ग ❊ [Remedial Coaching Classes for SC/ST/BC's)

महाविद्यालयात दरवर्षी जुलैपासून अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग चालविले जात आहेत. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यानी महाविद्यालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

## ४) सूचना :-

१) सवलत पूर्ततेबाबत सविस्तर नोटीस लावली जाईल.

२) वरील सवलतीपैंकी फक्त एकाच सवलतीची कागदपत्रे सादर करावित.

३) वरील सवलत अर्ज प्रवेश घेतले पासून पंधरा दिवसाचे आत जमा करावेत.

४) नापास झालेल्या विद्यार्थ्याने पुन्हा त्याच वर्गात नियमित प्रवेश घेतल्यास त्याने फ्रीशिपसाठी अर्ज करावा.

५) विद्यार्थ्याचे वडील खाजगी अथवा सरकारी नोकरी करीत असल्यास त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला (पगार, महागाई भत्ता इत्यादीसह) संबंधित अधिकृत व्यक्तीच्या सहीनिशी अर्जासोबत जोडावा.

६) विद्यार्थ्याने अर्जामध्ये नमूद केलेली जात आणि त्याला संबंधित माध्यमिक शाळेकडून मिळालेल्या दाखल्यात असलेली जात एकच असावी.

७) विद्यार्थी जर मान्यताप्राप्त वसतिगृहात रहात असेल तर त्याने त्या वसतिगृहातील भोजनासाठी होणारा मासिक खर्च आणि प्रवेश तारीख यासंबंधी संपूर्ण व बिनचूक माहिती द्यावी. वसतिगृहप्रमुखांचा दाखला आवेदनपत्राला (प्रमाणित सत्यप्रत) जोडावा.

८) जर विद्यार्थ्यांचा सख्खा भाऊ अगर बहिण महाविद्यालयीन शिक्षण घेत असेल तर त्यासंबंधी खुलासेवार माहिती अर्जात नमूद करावी.

९) आवेदनपत्राबरोबर पास झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका प्रमाणित सत्यप्रत जोडावी.

१०) जातीसंबंधी प्रमाणपत्र खालील अधिकाऱ्याचे आणावे – संसद सदस्य / राज्य संघराज्य क्षेत्र/ शासनाने विशेषरित्या प्राधिकृत केलेला अधिकारी, यापैकी एकाची सही त्यावर असली पाहिजे.

११) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाने मान्य केलेली कोणत्याही प्रकारची फी भरावी लागत नाही.

१२) मागासवर्गीय शिष्यवृत्तीची रक्कम नियमितपणे बँकेतील खात्यावर परस्पर वर्ग केली जाते.

१३) जो विद्यार्थी पूर्णवेळ नोकरी करीत असेल त्यास महाविद्यालयात नियमित प्रवेश मिळणार नाही.

१४) एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक मुलांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. तथापि तिसरी मुलगी असल्यास तिला शिष्यवृत्ती मिळेल.

१५) शिष्यवृत्तीची रक्कम नियमित उपस्थिती, समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक यावर अवलंबून असेल.

१६) गतवर्षी ज्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे. अशा सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींनी प्रवेशाच्या वेळी स्वतंत्र अर्ज कार्यालयात सादर करावेत.

**डॉ. व्ही. एस. ढेकळे**
प्रभारी प्राचार्य,
राजे रामराव महाविद्यालय, जत.

# ◆ प्राध्यापक वृंद ◆

## प्र. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे

**● मराठी विभाग :**

प्रा. एस. एस. नरळे
प्रा. सौ. एन. व्ही. मोरे
प्रा. कु. ए. ए. हिबरे

**● हिंदी विभाग :**

प्रा. एच. डी. टोंगारे
प्रा. डॉ. एस. आय. भाड
प्रा. कु. डॉ. एन. एम. देसाई

**● इंग्रजी विभाग :**

प्रा. आर. डी. करांडे
प्रा. आर. एस. बनसोडे
प्रा. टी. यू. सन्नके
प्रा. ओ. डी. कुडाळकर
प्रा. व्ही. एन. यमगर

**● भूगोल विभाग :**

प्रा. ए. टी. शिंदे
प्रा. आर. बी. पाटील
प्रा. वाय. एस. शिंदे

**● इतिहास विभाग :**

प्रा. पी. जे. चौधरी
प्रा. आर. एस. कांबळे

**● राज्यशास्त्र विभाग :**

डॉ. बी. एम. डहाळके
प्रा. ए. एस. टिके

**● अर्थशास्त्र विभाग :**

डॉ. एस. जी. गावडे
प्रा. ए. एच. बोगुलवार
प्रा. आर. डी. सावंत
प्रा. डी. बी. रणदिवे

**● वाणिज्य विभाग :**

डॉ. व्ही. एस. ढेकळे
प्रा. ए. आर. हेरवाडे

**● शारिरीक शिक्षण विभाग :**

प्रा. एस. एस. चव्हाण

**● पदार्थ विज्ञान विभाग :**

डॉ. ए. के. भोसले
डॉ. एस. आर. कोकरे
डॉ. एस. एस. लट्ठे
प्रा. आर. एस. सुतार
प्रा. एस. एस. अंकलगी
प्रा. कु. एस. पी. पट्टणशेट्टी
प्रा. कु. एस. बी. शिंदे
प्रा. कु. आर. एल. कलाल

**● रसायनशास्त्र विभाग :**

प्रा. के. के. रानगर
डॉ. एस. आर. कुलाळ
प्रा. जी. डी. साळुंखे
प्रा. डी. ए. कुंभार
डॉ. बी. टी. खोगरे
प्रा. आर. बी. सावंत
प्रा. कु. व्ही. सी. माळी
प्रा.कु. एन. आर. बोबडे
प्रा. एन. बी. तोरणे
प्रा. एन. जी. हिरेमठ
प्रा. एस. सी. कोळी
प्रा. कु. एम. आर. मुजावर
प्रा. कु. एस. के. जाधव
प्रा. कु. पी. टी. भुसनार
प्रा. कु. एस. एस. शेख
प्रा. कु. एस. डी. पाटील

**● प्राणीशास्त्र विभाग :**

प्रा. एम. एच. करेन्नावार
प्रा. एम. बी. सज्जन
डॉ. व्ही. एस. जाधव
प्रा. कु. एस. बी. देशमुख
प्रा. कु. एल. पी. सपताळ

**● वनस्पतीशास्त्र विभाग :**

डॉ. आर. ए. लवटे
प्रा. कु. व्ही. व्ही. खोत
प्रा. कु. एम. ए. जगताप

**● गणित विभाग :**

प्रा. व्ही. व्ही. चांडवले
प्रा. ए. टी. गडदे
प्रा. कु. व्ही. एस. सावंत
प्रा. कु. एम. आर. बनसोडे

**● संख्याशास्त्र विभाग :**

प्रा. कु. व्ही. बी. माळी
प्रा. कु. एस. ए. कोळी

**● संगणकशास्त्र विभाग :**

प्रा. एस. एम. पाटील

**● बी.सी.ए. विभाग :**

प्रा. एस. जी. माळी
प्रा. कु. जे. आय. बाळेकई
प्रा. पी. डी. माळी

# प्रशासकीय कर्मचारी

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. आर. बी. जोग | अधिक्षक | श्री. एम. डी. कोळेकर | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एम. व्ही. मोरे | मुख्य लिपिक | श्री. जी. एम. हेगडे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. आर. एस. शिंदे | वरिष्ठ लिपिक | श्री. एन. टी. खुडे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. बी. के. पुजारी | प्रयोगशाळा सहाय्यक | श्री. टी. ए. शिंगाडे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एस. डी. राजमाने | कनिष्ठ लिपिक | श्री. आर. एन. इमडे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एस. बी. मोईन | ग्रंथालय लिपिक | श्री. ए. बी. शिरगारे | प्रयोगशाळा परिचर |
| श्री. एस. वाय. साळुंखे | ग्रंथालय परिचर | श्री. ए. एम. घुगरे | सेवक |
| श्री. जे. एम. सदाकाळे | ग्रंथालय परिचर | | |

# VARIOUS COMMITTEES FOR THE ACADEMIC YEAR 2019-2020

1. Gymkhana Committee
2. Time-table Committee
3. Election Committee
4. N. S. S. Committee
5. N. C. C. Committee
6. Examination Committee
7. College Annual & Wall Paper Committee
8. Study tour Committee
9. Publicity Committee
10. Students Discipline Committee
11. Students welfare Committee
12. Cultural Activities Committee
13. Debating and Various Competition Committee
14. Library Committee
15. Science Association
16. Garden Committee
17. Standing Committee
18. Building Committee
19. Students' Grievance Redressal Cell
20. Students' Development Cell
21. Internal Complaint Committee
22. Parents' Alumni Committee
23. U.G.C. Correspondence Committee
24. Purchase Committee
25. Competitive Examination Guidance Committee
26. Dr. Bapuji Salunkhe English Literary Association
27. Marathi Vangmaya Mandal
28. Hindi Vangmaya Mandal
29. Anti Ragging Committee.
30. Prospectus Committee.
31. Staff Academy Committee.
32. Internal Quality Assurance Committee.
33. Placement Cell
34. Lead College Committee.
35. Ladies Hostel Committee.
36. Research Committee.
37. College Website Committee.

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Sr.No. 002308

# CERTIFICATE

This is to certify that University approval is given to ***Raje Ramrao Mahavidyalaya, Jath Dist. Sangli*** to conduct the following courses for the academic year 2020-21

**FACULTY OF Humanities, Commerce and Management and Science and Technology**

**BA-I** **Grant in aid Division - 2** **Permanent Affiliation**

Govt. Approval - महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग दि. ०८ मे, १९७३

University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.

Compulsory - इंग्रजी, मराठी, हिंदी

Optional - मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास, शाररिक शिक्षण

**BA-II** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - क्र. युकेएफ-१०८१/५७७५/विशि-२ दि. ०६ जून, १९८१

University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.

Compulsory - इंग्रजी, एच,एस.आर.एम., लोकप्रशासन, सहकार, मराठी वाङःमय दर्शन

Optional - मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास, शाररिक शिक्षण

**BA-III** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - क्र. युकेएफ-१०८१/५७७५/विशि-२ दि. ०६ जून, १९८१

University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.

Compulsory - इंग्रजी

Optional - मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास

**B.Com.-I** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग दि. ०८ मे, १९७३

University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.

Compulsory - इंग्रजी, मराठी

Optional - विपणाचीतत्वे, व्यवस्थापनाची तत्वे, लेखाशास्त्रे, व्यावसायिक अर्थशास्त्र, विमाशास्त्रे

**B.Com.-II** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - क्र. युकेएफ-१०८१/५७७५/विशि-२ दि. ०६ जून, १९८१

University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.

Compulsory - इंग्रजी

Optional - लेखाशास्त्रे, व्यावसायिक अर्थशास्त्र, बिझनेस प्लॅनिंग ॲण्ड पॉलिसी, बँकिग ॲण्ड फायनान्स, बिझनेस स्टॅटॅस्टिक ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लीकेशन

**B.Com.-III** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**

Govt. Approval - क्र. युकेएफ-१०८१/५७७५/विशि-२ दि. ०६ जून, १९८१

University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.

Compulsory - आय.एम. पेपर १ व २, लेखाशास्त्र पेपर १ व २, मॅनेजमेंट थॉट, बिझनेस लॉ, को. ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट, वर्ल्ड इकॉनॉमिक्स एन्व्हार्नमेंट

**B.Sc.-I** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**
Govt. Approval - क्र. युकेएफ-१०८१/५७७५/विशि-२ दि. ०६ जून, १९८१
University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.
Compulsory - English
Optional - Physics, Chemistry, Maths, Stats., Botany, Zoology, Computer Science

**B.Sc.-II** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**
Govt. Approval - क्र. युकेएफ-१०८१/५७७५/विशि-२ दि. ०६ जून, १९८१
University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.
Optional - Physics, Chemistry, Maths, Stats., Botany, Zoology, Computer Sciecne

**B.Sc.-III** **Grant in aid Division - 1** **Permanent Affiliation**
Govt. Approval - क्र. युकेएफ-१०८१/५७७५/विशि-२ दि. ०६ जून, १९८१
University Approval - संलग्नता/टी-२/फा. ५४/२५७१, दि. २० जून २००२.
Compulsory - English
Optional / Special - Chemistry, Physics, Maths, Botany, Zoology

**B.Sc.-I II & III** **Non Grant** **Intake - 60**
Govt. Approval - क्र. शिविस २००१/विस्तार/(४/०१)/मशि-३, दि. १२ जुलै, २००१
University Recent Approval - संलग्नता/टी-२/एसआरएस/विद्यापरिषद विषय क्र. ३१ दि. १५/०६/२०२०/१४२७ दि. ३०.०६.२०२०
Subject - Computer Sciece

**M.Sc.-I & II** **Non Grant** **Intake - 20**
Govt. Approval - एनजीसी २०१७ (१४७/१७)/मशि-४ दि. ११ ऑगस्ट, २०१७
University Recent Approval - संलग्नता/टी-२/एसआरएस/विद्यापरिषद बैठक क्र. ३१ दि. १५/०६/२०२०/१४२७ दि. ३०.०६.२०२०
Subject - Analytical Chemistry

**M.Sc.-I & II** **Non Grant** **Intake - 20**
Govt. Approval - एनजीसी २०१६ (१०२/१६)/मशि-४ दि. ०४ जुलै, २०१८
University Recent Approval - संलग्नता/टी-२/एसआरएस/विद्यापरिषद विषय क्र. ३१ दि. १५/०६/२०२०/१४२७ दि. ३०.०६.२०२०
Subject - Physics

**B. C. A.-I, II, III (Semester I to VI)** **Intake - 80 Seats**
Govt. Approval - एनजीसी २०१८ (२१५/०८)/मशि-३, दि. १९ जून, २०१८
University Recent Approval - संलग्नता/टी-२/एसआरएस/वि.प.वि.क्र. ३१ दि.१५.०६.२०२०/१४२७, दि. ३०.०६.२०२०
Course - संपूर्ण अभ्यासक्रम

**B.A.-II, B.Com. II, B.Sc. II & B.C.A. II**
University Circular - SU/BOS/Env. - Sy1/Dhawan/11594/11125, Dtd. 16 March, 2005
Compulsory - पर्यावरण अभ्यास

**Courses Under Distance Education Centre - B.A., B.Com., M.A., M.Com.**

**Place** - KOLHAPUR
**Date- 23 July 2019**

**REGISTRAR**
Shivaji University, Kolhapur




इनडीअर स्पोर्टस फॅसिलिटी हॉल





श्रीमंत विजयसिंह राजे डफळे नॉलेज रिसोर्स सेंटर




राजे रामराव महाविद्यालय
एन.सी.सी. कॅडेट मार्चिंग
पास करताना

## ड्रेस कोड


कला (ARTS)



विज्ञान (SCINECE)



वाणिज्य बी.सी.ए. (COMMERCE)



# महाविद्यालयाची गुणवत्ता.....




महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागामार्फत आयोजित चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे



**सर्व सोयींनीयुक्त
श्रीमती सुशिलादेवी साळुंखे
मुलींचे वसतिगृह क्र. १**



**सर्व सोयींनीयुक्त
श्रीमती सुशिलादेवी साळुंखे
मुलींचे वसतिगृह क्र. २**

Rs. 50/-

Shree Sainath Printing Press, Karad